स्मरणपत्र
अत्यंत महत्वाचे

# University of Mumbai

सांख्यिकीविभाग
फोर्ट
मुंबई—४०० ०३२

Phone:-022-22618987
022-22708738

क्र. सांख्यिकी / MIS /234/२०१३

परिपत्रकः—

विषयः— उच्च शिक्षण संचालनालय व मॅनेजमेन्ट इंफॉरमेशन सिस्टिम एम.आय.एस विकसित करण्याबाबत.

संदर्भः— १) क्र उशिस/सांख्यिकी२०१३—१४/एमआयएस, दिनांक १९ ऑक्टोबर २०१३.
२) शासन पत्र क्र एमआयएस—२०१३ २८२१३ मशि—३ दिनांक २८ ऑक्टोबर २०१३.
३) क्र सांख्यिकी १२२ २१९ २०१३ दि. ३०—१२—२०१३ चे परिपत्रक.

महोदय,

विभाग प्रमुख, प्राचार्य व संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांचे लक्ष वरील संदर्भिय पत्रांकडे व परिपत्रकडे वेधण्यात येते.

राज्यातील उच्च शिक्षणबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०१३—१४ या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसाटीई अभ्यासक्रम शिकविणा—या महाविद्यालयाकडुन ऑनलाईन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात आलेली आहे.

याबाबत विभागप्रमुख व प्राचार्य यांना कळवू इच्छितो की,ब—याचशा विभागांनी व महाविद्यालयांनी सदर माहिती अद्याप भरलेली नसल्यामुळे, प्रशिक्षण संचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून विभाग व महाविद्यालयांवर कायदेशीर कारवाई का करू नये अशी विचारणा केली आहे.

याबाबतचे गांभीर्य जाणून विभाग प्रमुख व प्राचार्यांनी वैयक्तिक लक्ष घालुन MIS ची माहिती दिनांक २५ जानेवारी २०१४ पर्यत तातडीने संबधित नोडल अधिका—यांना online भरण्याचे आदेश दयावेत.

त्यासाठी महाविद्यालयांनी mis.dhepune/login.aspx या वेबसाईटवर जाऊन नोंदणी करावयाची असून तेथे उपलब्ध असलेल्या विवरणपत्रांमध्ये माहिती भरावयाची आहे.या संदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी ०२२— २२७०८७३८ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

तरी दिनांक २५ जानेवारी २०१४ पर्यत महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये माहिती तात्काळ भरून पाठवावी. सदर माहिती पाठविण्यास विलंब झाल्यास शासन कारवाईस संबंधित विभाग व महाविद्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

मुंबई ४०००३२.
दिनांकः— २१ जानेवारी २०१४.

संचालक